जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर.
आवक दिनांक :- 14-6-2019
आवक क्रमांक :
कार्यासनाचे नांव :- 26
(कार्या अधिक्षक) (म नि) (जि नि)

सहकारी संस्थांचे विशेष वसुली अधिकारी यांनी वापरावयाच्या मोहोर बाबत.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

जा.क्र.४ सआ/कायदा व वैधा.कार्य./विशेष वसुली अधि.मोहर वापर/५१९/२०१९
दि. ६/६/२०१९

**-: परिपत्रक:-**

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण - १५०४/प्रक्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ व्दारे विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाची राजमुद्रा वापरण्यास मनाई केली आहे. तथापी मे.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक १९९२/२००७ मध्ये दिनांक २६ मार्च २००७ चे अंतरिम आदेशाव्दारे सदर शासन निर्णयास स्थगिती दिली होती व दि.३० एप्रिल २००७ चे आदेशान्वये सदर स्थगिती कायम ठेवलेली आहे. सदर आदेशामध्ये वसुली अधिकाऱ्यांसाठी नवीन सील (मोहोर) निवडण्याचा पर्याय खुला ठेवला आहे.

महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील क्रमांक संकिर्ण १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दि.१९ जून २००८ च्या अधिसूचनेत "मुंबई सार्वजनिक प्राधिकरण मुद्रा अधिनियम १८८३ याच्या कलम ३ चे पोटकलम (४) व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (१९६४ चा महा. २४) च्या कलम १५६ च्या पोट कलम (१) चा खंड (इ) याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन याव्दारे विशेष वसुली अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (१९६४ चा महा. २४) च्या कलम १५६ च्या उपकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याकरीता त्यांच्या पत्रव्यवहार, आदेश इत्यादींकरीता निबंधक, सहकारी संस्था यांनी मंजूर केलेली मोहोर वसुली संबंधातील कामकाजाकरीता वापरण्यात अनुमती देत आहे." असे नमूद केले आहे.

तसेच शासन पत्र क्रमांक सीएसएल-२०१५/ प्र.क्र. २२१/ १३-स, दि.२५/१०/२०१६ नुसार विषयांकित बाबत विधी व न्याय विभागाकडून प्राप्त झालेले अभिप्राय या कार्यालयास कळविले आहेत. त्यानुसार - "वसुली अधिकारी हे वैधानिक पद असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०





Scanned with OKEN Scanner

च्या कलम १५६ अनुसार अशासकीय व्यक्तीची वसुली अधिकारी म्हणून नियुक्ती झाली तर ते सार्वजनिक प्राधिकरण मानण्यात येते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५६ चे उपकलम (१) अनुसार शासनाने वसुली अधिकारी म्हणून अधिसूचित केले असेल अशा अशासकीय व्यक्तीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये निबंधकांचे अधिकार बहाल केले असतील तर अशा अशासकीय व्यक्तींस महाराष्ट्र सार्वजनिक प्राधिकरण सील कायदा (V of 1883) कलम ३ अन्वये अधिसूचित केलेले सील वापरता येईल." असे कळविले आहे.

शासनाने वेळोवेळी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ चे प्रयोजनार्थ खालील संस्था अगर संस्थांच्या वर्गांना अधिसूचित केले आहे.

| अ.क्र. | अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक | अधिसूचित केलेल्या संस्था /संस्थांचा वर्ग |
|---|---|---|
| 1 | No.LDB.1075/ Delegation /C-1, dated 14 th May 1975 | Certain officers of the-<br>1.District Central Co-operative Banks<br>2.District Branches of Land Development Banks are notified. |
| 2 | No.CSL.1381/53332/(220) / 15-C, dated 22nd October 1981 | The Maharashtra State Co-operative Land Development Bank Limited, Bombay.<br>The Maharashtra State Co-operative Bank.<br>All the District Central Co-operative Banks. |
| 3 | No.CSL. 1086/51062/CR-297/ 15-C, dated 23rd January 1987 | Maharashtra Co-operative Housing Finance Society Limited Bombay. |
| 4 | CSL. 1097/ CR- 167 / 15-C, dated 13th October, 1997 | All District Co-operative Federations / Associations of the Urban Co-operative Credit Societies. |
| 5 | No.CSL. 1605/C.R. -1202/ 15-C, dated 2nd April 2005 | Urban Co-operative Credit Societies / Rural Non-Agricultural Co-operative Credit Societies with deposits are more than Rs. One Crore and jurisdiction of a District or more for the purposes of the said section 156. |
| 6 | No.CSL. 1503/CR-93/15-C dated 21.11.2003 | The Maharashtra State Co-operative Marketing Federation, Mumbai. |

परिपत्रकीय सूचना -

शासन अधिसूचना दि.१९ जून २००८ व शासन पत्र दि.२५/१०/२०१६ नुसार कळविलेले विधी व न्याय विभागाचे अभिप्राय यांचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे परिपत्रकिय सूचना निर्गमित करण्यात येत आहेत-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) च्या प्रयोजनार्थ अधिसूचित केलेल्या संस्थांच्या ज्या अधिकाऱ्यांना शासनाने कलम १५६(१) अन्वये अधिसूचित केले आहे व त्यांना निबंधकाने



Scanned with OKEN Scanner

१५६ चे अधिकार प्रदान केलेले आहेत त्या अधिकाऱ्यांनी यापुढे त्यांच्या पत्रव्यवहार, आदेश इत्यादींकरीता खालीलप्रमाणे मोहोर वापरण्यासाठी निश्चित करण्यात येत आहे.

सहकारी संस्थांचे विशेष वसुली अधिकारी यांनी वापरावयाच्या माहोरच्या आतील वर्तुळाचा व्यास २.५ (अडीच) सेंटिमीटर असेल आणि बाहेरिल वर्तुळाचा व्यास ४ (चार) सेंटिमीटर असेल.




(सतिश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:-**

१) (सर्व) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन).
२) (सर्व) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण).
३) (सर्व) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
४) (सर्व) जिल्हा विशेष लेखापरिक्षक.
५) (सर्व) कार्यासन अधिकारी, मुख्यालय, पुणे.
६) (सर्व) विशेष वसुली अधिकारी.

**प्रति**

कार्यासन अधिकारी, माहिती तंत्रज्ञान, यांना कळविण्यात येते की, सहकार आयुक्त यांचे sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'अधिसूचना'मध्ये सदर परिपत्रक 'परिपत्रके' मध्ये व बातम्यांमध्येही upload करावे.

**प्रत माहितीसाठी :**

१) कक्ष अधिकारी (१३-स), मंत्रालय, मुंबई -३२
२) मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि., भारतीय क्रिडा मंदिर, ४था मजला, वडाळा, मुंबई ४०० ०३१ यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नुसार आपले पत्र जा.क्र.४४७/ सहकार आयुक्त /२०१८-१९ , दि.६ डिसेंबर २०१८ चा संदर्भ निकाली काढण्यात येत आहे.